दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper. lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२५७ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, गुरुवार, २९ फेब्रुवारी २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

## कडोंमपा नगररचना कर्मचारी अटक प्रकरणात पोलिसांकडून भूमि अभिलेख कार्यालयातील अभिलेखांची तपासणी



**कल्याण, रोहित जसवाल :** कल्याण डोंबिवली पालिकेच्या नगररचना विभागातील दोन कर्मचाऱ्यांच्या अटकेनंतर या प्रकरणाशी येथील तालुका भूमिअभिलेख कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांचा काही सहभाग आहे का? डोंबिवलीतील विकासक विनोद किसन म्हात्रे यांनी पालिका नगररचना विभागात दाखल केलेल्या इमारत आराखडा प्रस्तावात भूमिअभिलेख विभागाचा बनावट नकाशा, तेथील अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या, शिक्के यांचा सहभाग आढळून आला आहे. त्यामुळे मंगळवारी बाजारपेठ पोलिसांचे पथक गांधारे भागातील भूमिअभिलेख कार्यालयात पोहचताच तेथील उपस्थित कर्मचाऱ्यांची तारांबळ उडाली. तालुका भूमिअभिलेख अधिकारी नितीन साळुंखे यांना पोलिसांनी कार्यालयातील कडोंमपा नगररचना विभागाशी संबंधित कागदपत्रांची तपासणी करण्यासंदर्भातचा हुकूम दाखविला. भूमिअभिलेख विभागाने पूर्ण सहकार्य करून पोलिसांना विकासक विनोद किसन म्हात्रे, भूमापक बाळू बहिराम, आरेखक राजेश बागुल प्रकरणाशी सर्व कागदपत्रे दाखवली. विकासक विनोद म्हात्रे यांची डोंबिवलीतील महाराष्ट्रनगर मधील इमारत उभारताना त्यांनी पालिकेच्या नगररचना विभागाला भूमिअभिलेख विभागातील अधिकाऱ्यांची स्वाक्षरी, शिक्क्यांचा वापर करून बनावट मोजणी नकाशा सादर केला होता. या नकाशाची स्थळपाहणी करणे नगररचना विभागातील भूमापक बहिराम, बागुल यांचे काम होते. हे काम भूमापकांनी योग्य केले आहे की नाही याची खात्री करून विनोद म्हात्रे यांचा बांधकाम आराखडा मंजूर करून घेणे हे तत्कालीन नगररचनाकार राजेश मोरे, कनिष्ठ अभियंता ज्ञानेश्वर आडके यांचे काम होते. पण या दोन्ही अधिकाऱ्यांनी भूमापकांच्या सर्वेक्षण नकाशाकडे दुर्लक्ष केले. बहिराम यांनी विनोद यांच्या जमिनलगतची सहा गुंठे गुरचरण जमीन विनोद यांच्या मालकीत दाखवून बनावट नकशा तयार केला. गुरचरण जमीन निदर्शनास आणणे हे बहिराम यांचे काम होते. या गुंतागुंतीमुळे पोलिसांनी भूमि अभिलेख कार्यालयातील कोणी कर्मचारी या प्रकरणाशी संबंधित आहे का. ही बनावट मोजणी नकशा कागदपत्रे विकासक, भूमापकाने कशी तयार कली याचा पोलीस तपास करत आहेत. आडके हे फरार आहेत. याप्रकरणाशी संबंधित नगररचना अधिकारी निलंबित करा.

## ज्येष्ठांचा एल्गार !
# सरकारला तीस दिवसांचा अल्टिमेटम, विविध मागण्यांसाठी केंद्र आणि राज्य सरकारला निवेदन



**मुंबई, यश सावंत :** येत्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ज्येष्ठ नागरिकांनी केंद्र आणि राज्य सरकारला विविध मागण्यांचे निवेदन दिले आहे. त्यात नमूद मागण्यांच्या अनुषंगाने तीस दिवसांच्या आत सकारात्मक निर्णन न घेतल्यास आंदोलन पुकारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

ज्येष्ठ नागरिक महामंडळाने (विदर्भ) विविध ज्येष्ठ नागरिक मंडळांची मोट बांधली असून आगामी सार्वत्रिक निवडणुकांच्या अनुषंगाने मागण्यांचा पाढा वाचण्यात आला आहे. ज्येष्ठांसाठी महाराष्ट्रात कॅबिनेट दर्जाचे स्वतंत्र मंत्रालय त्वरित सुरू करावे, आर्थिक सवलतीसाठी जसे वृध्दापकाळ पेन्शन योजना, प्रवासी बस सवलत यांकरिता ज्येष्ठांचे वय ६० वर्षे करावे, प्रवासी बस सवलतीला असलेली चार हजार किलोमीटरची वार्षिक मयार्दा रद्द करावी, ज्येष्ठांना त्यांच्या वाहनांसाठी महाराष्ट्रभर नामांतरण सुविधा (नॉमिनेशन सुविधा) लागू करावी, ज्येष्ठ नागरिक सर्वसमावेषक धोरण अंमलबजावणी समिती आणि ज्येष्ठ नागरिक कार्यकारी समिती या मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठीत झालेल्या समितीच्या बैठका घेऊन ज्येष्ठ नागरिक धोरणाची अंमलबजावणी करावी, ज्येष्ठांच्या सर्व प्रकारच्या ठेवींना विमा संरक्षण द्यावे, ज्येष्ठांना निःशुल्क आरोग्य सेवा देण्यात याव्या, प्रत्येक जिल्ह्यात, प्रत्येक विधानसभा मतदारसंघात ज्येष्ठांना ह्यऔषधी परामर्श सल्ला केंद्रेह्ल सुरू करावित, ज्येष्ठांसाठी आवश्यक प्रमाणात कोर्निया राज्यात उपलब्ध होण्यासाठी महाराष्ट्रात नेत्रदानाविषयी समाजजागृती करावी तसेच सर्वांना नेत्रदान आवश्यक करावे, ज्येष्ठांना राष्ट्रीय संपत्तिचा दर्जा देत त्यांना सन्मानाने जीवन जगण्यासाठी प्रतिमाह किमान १०,५०० रुपये मानधन देण्यात यावे, अशा मागण्या करण्यात आल्या आहेत.

### रेल्वे सवलत सुरू करण्याची मागणी

रेल्वे प्रवासात ज्येष्ठ नागरिकांना मिळणारी भाडे शुल्कावरील सवलत करोनादरम्यान बंद करण्यात आली. ती पुन्हा एकदा सुरू करण्यासंदर्भात महामंडळ आग्रही आहेत. त्याचप्रमाणे कोश्यारी कमिटीच्या शिफारशी लागू करून ईपीएस-९५ पेन्शनधारकांची पेन्शन वाढविण्यात यावी, ज्येष्ठांसाठी टीडीएसची मयार्दा तीन लाखपर्यंत करण्यात यावी, नागपूरहून पुण्यासाठी दररोज वंदे भारत स्लीपर कोच सुपर एक्सप्रेस सुरू करण्यात यावी, असेदेखील महामंडळाचे म्हणणे आहे.

## अरबी भाषेत संवाद साधून आखाती देशातील नागरिकांना लुटणारी दिल्लीतील टोळी गजाआड



**पुणे विशेष प्रतिनिधी :** पुण्यात वैद्यकीय उपचारासाठी आलेल्या आखाती देशातील नागरिकांना लुटणाऱ्या दिल्लीतील चोरट्यांना पोलिसांनी पकडले. अटक करण्यात आलेली चोरटे इराणी टोळीतील असून, ते अरबी भाषेत आखाती देशातील नागरिकांशी संवाद साधत असल्याचे तपासात उघडकीस आले आहे. चोरट्यांकडून तीन हजार डॉलर, ५०० सौदी रियाल, ५३ हजार रुपये आणि मोटार असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चोरट्यांनी पुणे शहरात परदेशी नागरिकांकडे पोलीस असल्याची बतावणी करून त्यांना लुटल्याचे तपासात उघडकीस आले आहे. सिकंदर अली शेख (वय ४४), करीम फिरोज खान (वय २९), इरफान हुसेन हाश्मी (वय ४४), मेहबूब हमदी खान (वय ५९, चौघे रा. दिल्ली) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत सालेह ओथमान अहमद (वय ५२, रा. येमेन) यांनी कोंढवा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. अहमद यांनी पत्नीला वैद्यकीय उपचारासाठी पुण्यात आणले होते. पुण्यात उपचारासाठी येणारे आखाती देशातील बहुसंख्य नागरिक कोंढवा भागात वास्तव्यास आहेत. त्यांनी हिंदी येत नाही, तसेच त्यांचा पेहराव वेगळा असल्याने ते पटकन नजरेस येतात, अशी माहिती कोंढवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे यांनी दिली. अहमद ८ फेब्रुवारी रोजी कोंढव्यातून निघाले होते. त्यावेळी आरोपींनी त्यांना अडवले. पोलीस असल्याची बतावणी करून त्यांना लुटले होते. आरोपी मोटारीतून पसार झाल्याचे सीसीटीव्ही चित्रीकरणात आढळून आले होते. मोटार द्रुतगती मार्गावरील उर्से टोलनाका, मुंबई, चारोटी टोलनाका, डहाणूमार्गे दमणकडे गेल्याचे आढळून आले. आरोपी तेथील एका हॉटेलमध्ये मुक्कामास थांबले होते. हॉटेलमध्ये आरोपींनी त्यांचे ओळखपत्र दिले होते. पोलिसांचे पथक त्यांच्या मागावर होते. ओळखपत्र आणि हॉटेलमधील नोंदीवरुन आरोपींची ओळख पटली. पोलिसांनी पुणे ते दमण असा साडेतीनशे किलोमीटरचा प्रवास करुन चोरट्यांचा माग काढला. दमणपर्यंत चोरटे मोटारीतून गेल्याची माहिती तपासात मिळाली. सहायक पोलीस निरीक्षक लेखांजी शिंदे, पोलीस कर्मचारी सुहास मोरे, राहुल थोरात यांनी चोरट्यांचा माग काढला. अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त आर. राजा, सहायक आयुक्त गणेश पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संतोष सोनवणे, गुन्हे शाखेचे निरीक्षक मानसिंग पाटील, सहायक निरीक्षक लेखाजी शिंदे, दिनेश पाटील, अमोल हिरवे, जयदेव भोसले, अभिजीत रत्नपारखी, अभिजीत जाधव, शशांक खाडे यांनी ही कारवाई केली.

## तीन महिन्यांच्या चिमुकलीचं अपहरण करुन हत्यारप्रकरणी मुंबई सत्र न्यायालयाने आरोपीला सुनावली फाशीची शिक्षा



**मुंबई, विशाल पाटील :** तीन महिन्यांच्या चिमुकलीचं अपहरण करुन अत्याचार करत हत्या केल्याप्रकरणी सत्र न्यायालयाने दोषी तृतीयपंथीयाला फाशीची शिक्षा सुनावली आहे. २०२१ मध्ये कफ परेड भागात तृतीयपंथीयाने हे संतापजनक कृत्य केलं होतं. पोक्सो विशेष न्यायालयाचे न्यायाधीश अदिती कदम यांनी ही शिक्षा सुनावली. आरोपीने बाळावर अत्याचार करुन हत्या करत पुरावे नष्ट करण्यासाठी बाळाला खाडीत फेकलं होतं. अत्यंत वाईट अशी ही घटना असल्याचं न्यायाधीशांनी निकाल देताना सांगितले. विशेष सरकारी वकील राकेश तिवारी यांनी हा खटला दुर्मिळ असल्याचं म्हणत फाशीच्या शिक्षेची मागणी केली होती. आरोपींचा या गुन्ह्यात सहभाग असल्याचे अनेक ठोस पुरावे न्यायालयात सादर करण्यात आले होते. एका साक्षीदाराने देखील आरोपीला चिमुकलीला घेऊन जाताना पाहिले होते. ज्यामुळे आरोपीनेच चिमुकलीचे अपहरण केल्याचे स्पष्ट झाले होते. त्यानंतर मुलीची निर्घृण हत्या करण्यात आली, असं सरकारी वकील राकेश तिवारी यांनी आपल्या युक्तीवादात म्हटलं. आरोपी तृतीयपंथीयांने ८ जुलै २०२१ रोजी कफ परेड परिसरात फिरताना चिमुकलीच्या घरी जात आशीर्वाद दिले होते. त्यानंतर घरच्यांकडे साडी, नारळ आणि पैशांची मागणी केली. मात्र बाळाच्या घरच्यांनी परिस्थिती नसल्याचं सांगून नकार दिला होता. मात्र काहीही न दिल्याने तृतीयपंथीयाने तिथेच वाद घातला होता. रागाच्या भरात याचा बदला घेण्यासाठी आरोपीने हे कृत्य केल्याचे तपासात निष्पन्न झालं. पोलिसांनी तृतीयपंथी आणि त्याच्या साथीदाराविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम 302, 376 (बी, डी), 363 201,34 आणि पॉक्सो कायद्याच्या विविध कलमांखाली गुन्हा दाखल केला होता.

## नागपूर - मुंबई विमान प्रवासादरम्यान एकाच विमान कंपनीची मक्तेदारी; प्रवासी त्रस्त..

**नागपूर, नितीन देवळेकर :** भारत सरकारद्वारे देशभरात विमानसेवेचे जाळे विणण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून छोट्या विमानसेवेद्वारे लहान शहरात 'कनेक्टिव्हीटी' वाढवणाऱ्यावर भर दिला जात आहे. परंतु, महाराष्ट्राची राजधानी आणि उपराजधानीमध्ये प्रवाशांची संख्या गेल्या काही वर्षांत कैकपटीने वाढूनदेखील येथे विमानांची संख्या आणि नवीन विमान कंपन्यांची सेवा वाढवण्यात येत नसल्याचे चित्र आहे. परिणामी, एका कंपनीची मक्तेदारी निर्माण होत आहे. गेल्या काही वर्षांत नागपूर ते मुंबई प्रवास करणाऱ्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता नागपूर येथून उड्डाणांची संख्या वाढवणे अपेक्षित होते. परंतु, तसे झाले नाही. सध्या एअर इंडियाचे मुंबईहून नागपूरला येणारे आणि नागपूरहून मुंबईला जाणारे विमान आहे. एअर इंडियाच्या उड्डाणाची वेळ गैरसोयीची आहे. शिवाय हे उड्डाण अनेकदा विलंबाने



होत असते. इंडिगोची मुंबईला जाणारी आणि नागपूरला येणारी चार विमाने आहेत. यात सकाळी दोन, दुपारी एक आणि रात्री एक विमान आहे. मुंबईहून नागपूरसाठी सकाळी दोन, सायंकाळी दोन आणि रात्री एक विमान आहे. इंडिगोच्या विमानांमध्ये खूप गर्दी असते. त्यामुळे आपत्कालीन स्थितीत प्रवास करावयाचा झाल्यास २८ हजार रुपयांपर्यंत एकेरी प्रवासाचे भाडे मोजावे लागते. प्रवासी संख्या बघता येथून आणखी नवीन कंपनीची विमानसेवा सुरू व्हावी म्हणून केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी प्रयत्न करायला हवे, असे मत नागपूर येथील एक प्रवासी अभिजीत सोनटक्के यांनी व्यक्त केले.

## पनवेल महापालिकेकडून थकबाकीदारांना मालमत्ता जप्तीची नोटीस



**पनवेल, भावना जैन :** मालमत्ता कर न भरलेल्या थकबाकीदारांना जप्तीपूर्व नोटिसा बजावण्यास पनवेल महापालिकेने सुरुवात केली आहे. आयुक्त गणेश देशमुख यांनी थकीत करवसुलीबाबत आक्रमक भूमिका घेतल्यानंतर काही दिवसांपूर्वीच या थकबाकीदारांची यादी प्रसिद्ध करून दणका दिला होता. आता आणखी एक पाऊल पुढे टाकत सोमवारपासून मालमत्ता जप्तीच्या नोटिसा वाटण्यास प्रशासनाने सुरुवात केली आहे. पनवेल महापालिका क्षेत्रात तीन लाख ५० हजार मालमत्ता करधारक आहेत. यातील केवळ ७७ हजार मालमत्ताधारकांनी प्रतिसाद दिला आहे. तब्बल दोन लाख ८० हजार मालमत्ताधारकांनी मालमत्ता कर भरण्याकडे पाठ फिरवली आहे. चालू आर्थिक वर्षात मात्र महापालिकेने आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर १७ एप्रिलपासून आजपर्यंत २६१ कोटी रुपयांची वसुली झाली आहे. मालमत्ता करवसुलीसाठी प्रशासनाने वेगवेगळ्या पद्धतीने दबाव आणून करवसुली करण्याचा प्रयत्न केला. परंतु अपेक्षेप्रमाणे यश आले नाही. त्यामुळे दीड ते १० लाखांपर्यंत थकबाकी असणाऱ्यांची नावे जाहीर करून आयुक्त गणेश देशमुख यांनी जप्तीचा इशारा दिला. यामध्ये १०१ औद्योगिक, १०७ अनिवासी, १०० निवासी थकबाकीदारांचा समावेश आहे. त्यांना कर भरण्यासाठी मुदत देण्यात आली होती. ही मुदत संपताच ४८ जप्तीपूर्व नोटिसा देण्यास सुरुवात केली. नावे प्रसिद्ध केल्यानंतर १५ दिवसांची मुदत देणाऱ्या पालिकेने नोटीस दिल्यानंतर पुन्हा सात दिवसांची मुदत कर भरण्यासाठी दिली आहे. परंतु सात दिवसानंतर करबुडव्यांवर वॉरंट काढून 'महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १२८' व 'अनुसूची ड प्रकरण ८ कराधान नियम ४७' अन्वये महानगरपालिकेस देय असलेल्या कराच्या थकबाकीपोटी जंगम, स्थावर मालमत्ता जप्त अथवा अटकावणी करून जाहीर लिलावाने विक्री करून थकबाकी वसूल करण्याची कारवाई केली जाईल.

## कोल्हापुरी साठी 'क्यूआर कोड' ; मोबाईलने होणार चीप स्कॅन, बनावट उत्पादनास बसणार चाप



**मुंबई, विशाल कारंडे :** ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा प्रयोग यशस्वी झाला असून, कोल्हापुरी चपलेस 'क्यूआर कोड' मिळाला आहे. चपलेच्या आत ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित एक छोटी चीप बसविण्यात आली असून, ही चप्पल मोबाईलने स्कॅन करताच ही कुठे बनवली, कोणत्या कारागिराने बनवली, याची माहिती उपलब्ध होणार आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यामुळे आता बनावट कोल्हापुरी चप्पल बनविणाऱ्यांवर आणि या बनावट चपलांच्या विक्रीवरही चाप बसणार आहे. बाजारात बनावट कोल्हापुरी चपलांचा सुळसुळाट वाढल्याने त्याला आळा घालण्यासाठी सामाजिक न्याय विभागाच्या संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाने (लिडकॉम) नवा प्रयोग राबवत कोल्हापुरी चपलांना 'क्यू आर' कोड दिला आहे. ग्राहकांना अस्सल आणि चांगली कोल्हापुरी चप्पल मिळावी यासाठी 'लिडकॉम'ने ब्लॉकचेन तंत्रज्ञानावर आधारित नवीन चपला विक्रीसाठी बाजारात आणल्या आहेत. हे तंत्रज्ञान इमरटेक इनोव्हेशन प्रा. लि. या कंपनीने बनविले आहे. या नव्या तंत्रज्ञानामुळे आता ग्राहकांना आता मोबाईलच्या एका क्लिकवर कोल्हापुरी चप्पल ही अस्सल आहे की बनावट आहे हे सहज ओळखता येणार आहे. विशेष म्हणजे चपलांमध्ये अशाप्रकारे तंत्रज्ञान प्रथमच वापरले जात आहे.

> संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळाच्या कोल्हापुरी चपलांसाठी ब्लॉक चेन या प्रयोगअंतर्गत 'क्यूआर कोड' प्रणाली विकसित करण्यात आली आहे. त्याचे अनावरण राज्याचे मुख्य सचिव नितीन करीर यांच्या हस्ते मंगळवारी करण्यात आले. 'लिडकॉम'च्या सुवर्ण महोत्सवानिमित्त मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात चामड्याच्या वस्तूंचे एक मार्च २०२४ पर्यंत प्रदर्शन व विक्री सुरू राहणार आहे. सामाजिक न्याय विभागाच्या वतीने एक लाख उमेदवारांना प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंरोजगार देण्याचे उद्दिष्ट आहे.
>
> **- सुमंत भांगे, सचिव, सामाजिक न्याय विभाग**

## पुणेकरांकडून मिळकतकर वसूल करण्यासाठी महापालिकेच्या भन्नाट आयडियाची सर्वत्र चर्चा



**पुणे, अभिजित येरल्लू :** पुणे महापालिकेने थकीत मालमत्ता कर वसूल करण्यासाठी भन्नाट आयडिया काढली आहे. बड्यांसह छोट्या थकबाकीदारांच्या मिळकत कराच्या वसूलीसाठी त्यांच्या घरासमोर महापालिकेचे वसूली पथक बँड वाजवत आहे. यामुळे थकीत रक्कम जमा होत असल्याचा अनुभव पुणे महापालिका वसूली पथकास येत आहे. पुणे महापालिकेने सोमवारपासून शहरात पाच पथकांच्या माध्यमातून बँड वाजवून थकबाकी वसूल करायला सुरुवात केली आहे. आत्तापर्यंत 1900 कोटी रुपयांची वसुली झालेली आहे. हे आर्थिक वर्ष संपण्यासाठी सव्वा महिना शिल्लक असताना प्रशासनापुढं आणखी 400 कोटी रुपये वसूल करण्याचे आव्हान आहे. दरम्यान थकबाकीदारांच्या घरासमोर बॅंड वाजू लागल्याने अनेक मिळकतधारक स्वतःहून थकीत मालमत्ता कर महापालिकेकडे जमा करु लागल्याचे चित्र आहे. पुणे महापालिकेच्या या भन्नाट आयडियाची शहरातील चौका-चौकात चर्चा सुरु आहे.

## 'रुग्णालयांसाठी उपचार खर्चाचे किमान दर ठरवावेत, सुप्रीम कोर्टाचे सरकारला आदेश



**नवी दिल्ली, प्रगती शर्मा:** खासगी रुग्णालयातील उपचाराचे शुल्क आणि अन्य दर ऐवढे वाढले आहेत की, सर्वसामान्यांना तेथून उपचार घेणे मुश्किल झाले आहे. खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल होणे म्हणजे आयुष्यभराच्या कमाईपेक्षा अधिक पैसे उपचारासाठी खर्च करावे लागतात. यामुळेच सुप्रीम कोटार्ने केंद्र सरकारला कठोर आदेश देत म्हटले की, सर्व राज्यांमधील रुग्णालयांसाठी उपचार खचार्चे किमान दर ठरवावेत. खासगी रुग्णालयांची मनमानी चालणार नाही. नॉन-गव्हर्नमेंट ऑगेर्नाइजेश 'वेटरंस फोरम फॉर ट्रांसपेरेंसी इन पब्लिक लाइफ' यांच्याकडून दाखल करण्यात आलेल्या याचिकेत रुग्णालायातील वैद्यकीय शुल्कासंदर्भात वेगवेगळे मापदंड असल्यासंदर्भात प्रश्न उपस्थितीत केले आहेत. याचिकेत असेही म्हटलेय की, वेगवेगळ्या रुग्णालयात मोतिबिंदूच्या शस्त्रक्रियेसाठी एका ठिकाणी 30 हजार रुपये तर दुसऱ्या ठिकाणी एक लाख रुपये घेतले जात आहेत. खरंतर शासकीय रुग्णालयात मोतिबिंदूची शस्त्रक्रिया केवळ 10 हजार रुपयांमध्ये होते. देशभरातील सर्व रुग्णालयांना निर्देश द्यावेत की, त्यांनी सर्व प्रकारचे उपचार आणि शस्त्रक्रियांच्या संदभार्तील खर्च रुग्णांसाठी रुग्णालयात लावावेत. खासगी आणि शासकीय रुग्णालयांनी आजारावरील उपचार आणि शस्त्रक्रियेचा खर्च किती येईल यासंदर्भात एक पत्रक स्थानिक भाषेसह इंग्रजीत लावावे, जेणेकरुन रुग्णांना वैद्यकीय खचार्संदर्भात कळेल असे सुप्रीम कोटार्ने आपल्या आदेशात केंद्राला सांगितले आहे.

## 'गोदा पार्क'ला पुन्हा 'अच्छे दिन', गोदा पार्कचा आता 'नमामि गोदा प्रकल्पा'अंतर्गत होणार



**नाशिक, सचिन कदमै :** राज्यात लोकसभा निवडणुकीत भाजप आणि मनसेच्या मनोमिलनाच्या चर्चा सुरू झाल्यानंतर महापालिकेने राज ठाकरेंचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या गोदा पार्कचा 'मेकओव्हर' करण्याचा निर्णय घेतला आहे. रिलायन्सने साकारलेल्या गोदा पार्कचा आता 'नमामि गोदा प्रकल्पा' अंतर्गत पुनर्विकास केला जाणार आहे. 'मनसे' ची नाशिक महापालिकेत सत्ता असताना जवळपास ५० कोटींचा खर्च गोदा पार्कवर करण्यात आला होता. परंतु, गोदावरीला आलेल्या महापुरात हा पार्क वाहून गेला होता. आता 'नमामि गोदा'त समावेशाने गोदा पार्कचा 'मेकओव्हर' होणार असल्यामुळे मनसे आणि भाजपचे नातेही अधिक घट्ट होण्याची शक्यता आहे. गोदाकाठावर निसगार्चा अनुभव नाशिककरांना होण्यासाठी राज ठाकरेंच्या संकल्पनेतून गोदा पार्क ही संकल्पना अमलात आणली गेली होती. महापालिकेमार्फत जवळपास २५ कोटी रुपये खर्च करून गोदा पार्क साकारण्यात आला. परंतु, देखभाल व दुरुस्तीअभावी गोदा पार्कची दुरवस्था झाली होती. नाशिककरांच्या वापराऐवजी हा पार्क मद्यपींचा, तसेच प्रेमीयुगुलांचा अड्डा बनला होता. त्यामुळे राज ठाकरेंनी रियालन्सकडून ५० कोटींची मदत घेऊन सीएसआरअंतर्गत पुन्हा गोदा पार्कचे पुनरुज्जीवन केले होते. रिलायन्स कंपनीच्या सामाजिक दायित्व निधीतून ५० कोटी रुपये खर्च करून बापू पुलाच्या दोन्ही बाजूंना घाट विकसित केला. परंतु, गोदावरीला आलेल्या महापुरात तो वाहून गेला. मनसेची सत्ता गेल्यानंतर भाजपनेही मनसेच्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाकडे दुर्लक्ष केले.

## मुंबईतून कोकणात जाणाऱ्या ट्रेनमध्ये मराठी वृत्तपत्र नसावं ही अत्यंत दुर्दैवी बाब- मनसे नेते नितीन सरदेसाई



**रत्नागिरी, दिगंबर जाधव :** राज्यात मंगळवारी (दि.२७ फेब्रुवारी) 'मराठी भाषा गौरव दिन' मोठ्या उत्साहात साजरा झाला. राज्यात विविध ठिकाणी अनेक कार्यक्रमांचं आयोजन देखील करण्यात आलं होतं. मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळावा यासाठी सरकारकडून वेगाने प्रयत्न देखील केले जात आहेत. मात्र मराठी भाषेला कसं डावललं जातं, याचा अनुभव मनसे नेते नितीन सरदेसाई यांना मुंबई-रत्नागिरी प्रवासादरम्यान रेल्वेमध्ये आला आहे.

मनसे नेते नितीन सरदेसाई यांना प्रवासादरम्यान आलेला अनुभव त्यांनी व्हिडीओच्या माध्यमातून सर्वांसोबत शेअर केला. नितीन देसाई यांनी आपल्या व्हिडीओत सांगितलं की, मी आता मुंबईहून मडगाव असा तेजस एक्स्प्रेसने प्रवास करत आहे. मी रत्नागिरीला जात आहे. या तेजस एक्सप्रेसमध्ये रेल्वे प्रशासनाकडून प्रवाशांच्या वाचनासाठी काही वर्तमानपत्र ठेवले आहेत. मात्र त्यात एकही मराठी वृत्तपत्र नाही. मुंबईतून कोकणात जाणाऱ्या ट्रेनमध्ये मराठी वृत्तपत्र नसावं ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. मी याबाबत रेल्वे प्रशासनाशी नक्कीच बोलणार आहे. मात्र मुंबईतून बाहेर जाणाऱ्या सर्व प्रवाशांनी रेल्वेत मराठी वृत्तपत्र असावीत याबाबत आग्रही असायला हवं. यापुढे रेल्वेत मराठी वृत्तपत्र मिळावीत ही मागणी आपण केली पाहिजे, असंही नितीन सरदेसाई यांनी म्हटलं आहे. नितीन सरदेसाई यांचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. नितीन सरदेसाई यांच्या भूमिकेचे सर्वचजण कौतुक करत आहेत. तुम्ही अगदी बरोबर प्रश्न उपस्थित केला आहे. वंदे भारत ट्रेनमध्ये देखील हीच स्थिती आहे, असं एका यूजरने सांगितलं. तर आणखी एका यूजरने म्हटलं की, मराठी वृत्तपत्रांना रेल्वेने प्राधान्य दिलं पाहिजे, असं म्हटलं आहे.

//सुविचार
जी लोकं सरळ मनात उतरतात त्यांना सांभाळून ठेवा
आणि जी मनातून उतरतात त्यांच्यापासून सावध रहा. //



# कॅरेबियन ओकरा कोकोनट चिल्ली

**साहित्य :** पाव किलो भेंडी, २ चमचे नारळाचे तेल, २ वाटी खोबरे, थाईम, ५-६ लसणाच्या पाकळ्या. आले, मीठ, मिरपूड, कोथिंबीर, २ टोमॅटो, हिरव्या मिरच्या, कांदा.

**कृती :** एका पातेल्यात तेल गरम करा. चिरलेला कांदा आणि आले-लसूण वाटलेले त्यात घाला. त्यातच बारीक चिरलेली भेंडी घालून कुरकुरीत होईपर्यंत परतून घ्या. यामध्ये वरून हिरवी मिरची घाला. चिरलेला टोमॅटोही त्यात घाला. सोबतच थाईमही घालून परतून घ्या. वरून खोबरे, कोथिंबीर घालून परत एकदा खरपूस परतून घ्या. थाईम आणि



# सुंदर चेहऱ्यासाठी गाजर आणि नारळ अत्यंत उपयोगी

आताच्या युगात प्रत्येक स्त्रिया आपल्या चेहऱ्याची आणि आरोग्याची विशेष काळजी घेताना दिसतात. त्यामुळे त्या वेगवेगळ्या प्रकारच्या सौंदर्य प्रसाधनांचा वापर करतात. रसायनयुक्त क्रिममुळे अनेक वेळा चेहऱ्यावर डाग पडतात. तर काही वेळा साईड इफेक्टदेखील होतो. परंतु घरगुती पदार्थांचा सौंदर्यवाढीसाठी वापर केला, तर चेहरा चांगला राहतो आणि ॲलर्जी तसेच साईड इफेक्टपासून सुटका होते. सुंदर चेहऱ्यासाठी गाजर आणि नारळ अत्यंत उपयोगी पदार्थ आहे.



**गाजर**

त्वचा जर निस्तेज झाली असेल आणि त्यावर तुम्हाला तेज आणायचे असेल तर गाजर एकमात्र उपाय आहे. यासाठी अगोदर गाजर किसून घ्या. त्यामध्ये दही, लिंबाचा रस आणि गुलाबपाणी घाला. हे मिश्रण १० मिनिटांसाठी चेहऱ्यावर ठेवा. त्यानंतर हलक्या हातांनी चेहऱ्यावर मसाज करा. त्यानंतर चेहरा स्वच्छ पाण्याने धुवून घ्या. या स्क्रबचा आठवड्यातून दोनदा वापर केल्याने चेहऱ्यावरील अतिरिक्त तेल कमी होऊन चेहरा अधिक उजळ होईल.



**नारळ**

नारळ हे आपल्या चेहऱ्यावरील सुंदरता वाढवण्यास उपयोगी ठरते, अगोदर नारळ किसून घ्या. त्यात एक चमचा हळद आणि चंदन तेलाचे १५ थेंब घाला. हे मिश्रण एकत्र करा. त्याची पेस्ट करून त्याने चेहऱ्यावर स्क्रब करा आणि नंतर चेहरा धुवून घ्या. या स्क्रबमुळे तुमच्या त्वचेवर तेजी येईल.



# घरगुती टिप्स : असे घालवा ग्रीस किंवा वॉर्निशचे डाग

■ साडीवर तेलकट डाग पडल्यास त्या डागांवर टाल्कम पावडर चोळावी. एक दिवस तसेच ठेवावे नंतर धुवावे.

■ सायकल ऑइलचे डाग निलगिरी तेलाने निघतात.

■ ग्रीस किंवा वॉर्निशचे डाग टर्पेंटाईलने जातात.

■ कपड्यावर पानाचे डाग पडले तर लगेचच लिंबू कापून डागावर घासावे, स्वच्छ पाण्यात धुवावे.

■ कपड्यांवर पडलेल्या डागांवर टूथपेस्ट लावावी आणि ती सुकल्यावर कपडे डिटर्जंटने धुवावे. डाग निघण्यास मदत होते.

■ उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये कपड्यांवर घामाचे पिवळसर डाग पडतात. लिंबाच्या रसाने हे डाग घालवता येतात. लिंबाचा रस या डागांवर १० मिनिटे लावून ठेवावा मग नेहमीप्रमाणे कपडे धुवून टाकावेत.

■ कपड्यांवरचे हळदी डाग घालवण्यासाठी व्हिनेगर अथवा लिंबू लावा किंवा कपडे धुण्याची कोरडी पावडर त्यावर लावून घासून काढा.

■ चहा, कॉफीचा पडलेला डाग प्रथम स्वच्छ धुवून घ्यावा मग जेथे डाग पडला आहे त्या भागावर बोरॅक्स पावडरची पेस्ट लावावी.

■ चिखलाचा डाग पडलेला भाग स्वच्छ धुवून घ्यावा, मग डाग पडलेल्या भागावर कच्चा बटाटा लावून थोड्या वेळाने डाग धुवावा.

■ शाईचा डाग पडलेल्या भागावर लिंबू व मीठ चोळावे व मग डाग धुवून टाकावा.



# रक्ताची कमतरता आहे? मग हे करा...

**काही जणांना दम लागणे, कमजोरी वाटणे, थकवा जाणवणे अशा विविध समस्या असतात. या सर्व समस्या शरीरातील रक्ताच्या कमतरतेमुळे होत असते. ही कमतरता कशी भरून काढता येईल त्याच्यावर आधारित काही टिप्स...**



■ एक ग्लास सफरचंदाचा ज्यूस नियमित प्यावा.

■ सफरचंदाच्या ज्यूसमध्ये बीटचा रस आणि चवीनुसार मध टाकावे. या मिश्रणात लोह तत्त्व जास्त असते.

■ २ चमचे तीळ २ तास पाण्यामध्ये भिजवून ठेवा. पाणी गाळून तिळाची पेस्ट करून घ्या. यामध्ये मध मिसळून दिवसातून दोन वेळेस हे मिश्रण खावे. त्यामुळेही रक्ताची कमतरता दूर होण्यास मदत होते.

■ शेंगदाणे आणि गुळ एकत्र चावून खावा.

■ दिवसातून दोन वेळेस थंड पाण्याने स्नान करा. सकाळी थोडा वेळ सूर्यप्रकाशात बसा.

■ चहा आणि कॉफी पिण्याचे प्रमाण कमी करा.

■ दिवसातून एक वेळेस गवती चहा, दालचिनी, बडीशेप समान मात्रेमध्ये घेऊन चहा तयार करून घ्या.

■ शरीरात रक्ताचे प्रमाण वाढवण्यासाठी अंकुरित धान्याचे सेवन करावे.

■ मीठ आणि लसणाचे नियमित सेवन करावे, यामुळेही हिमोग्लोबिनचे प्रमाण वाढते.

■ सोयाबीन आयर्न आणि व्हिटॅमिनयुक्त असते. त्याचे सेवन केल्यास तो फॅटसह जास्त प्रमाणात आयर्न मिळवण्यास मदत करतो.

■ नियमित बीटचे सेवन केल्यास रक्त वाढण्यास मदत होते.

■ टोमॅटोमध्ये भरपूर प्रमाणात व्हिटॅमिन सी आणि लायकोपिनचे प्रमाण आढळून येते. त्यामुळे शरीराला खूप मदत मिळते.

अशा सर्व घरगुती टिप्सचा वापर केल्यास तुमच्या शरीरातील रक्ताची कमतरता दूर होईल व तुम्हाला निरोगी राहण्यास मदत मिळेल.

# इन्स्टाग्रामवर अनोळखी व्यक्ती देत आहे त्रास? ही सेटिंग करा आणि लगेचच मिळवा सुटका

आपण सारेच इन्स्टाग्राम वापरत असतो, पण अनेकदा इन्स्टाग्रामवर आपल्याला अनोळखी अकाऊंटवरून त्रास दिला जातो. पण आज आम्ही तुम्हाला एक अशी पद्धत सांगत आहोत ज्याद्वारे तुम्ही अनोळखी आयडीवरून येणारे मेसेज सहजपणे ब्लॉक करू शकता.




इन्स्टाग्राम हे आजकाल सर्वाधिक वापरले जाणारे सोशल मीडिया ॲप आहे. आपण यावर अनेक गोष्टी करू शकतात. सुरुवातीला फक्त फोटो पोस्ट करण्यासाठी प्रसिद्ध असलेलं इन्स्टाग्राम आता विविध फीचर्ससह येतं. इन्स्टा रिल्स तर आजकाल सर्वाधिक स्क्रिनटाईम खातात. पण अशातच अनेकदा इन्स्टाग्रामवर आपल्याला अनोळखी अकाऊंटवरून त्रास दिला जातो. पण आज आम्ही तुम्हाला एक अशी पद्धत सांगत आहोत ज्याद्वारे तुम्ही अनोळखी आयडीवरून येणारे मेसेज सहजपणे ब्लॉक करू शकता.

तुमच्या कॉण्टॅक्ट लिस्टमध्ये नसलेली एखादी व्यक्ती तुम्हाला डायरेक्ट मेसेज करत असेल तर तुम्ही काय कराल? असे लोक तुम्हाला खूप त्रास देऊ शकतात. असे संदेश तुम्ही स्वीकारल्यानंतरच तुमच्या चॅट लिस्टमध्ये दिसतात. त्याचबरोबर तुम्हाला मेसेज करणाऱ्या लोकांच्या चॅट्स तुमच्या चॅट लिस्टमध्ये येतात. तर तुम्हाला अशा अनोळखी लोकांना मेसेज पाठवण्यापासून रोखायचे असेल तर तुम्हाला एक फीचर चालू करावे लागेल. यासाठी इन्स्टाग्रामने मेसेज ब्लॉकिंग फीचर आणले आहे. हे फीचर चालू करण्यासाठी, खालील सोप्या स्टेप्स तुम्ही फॉलो करू शकता...

■ सर्वप्रथम तुम्हाला इन्स्टाग्राम ॲपवर जावे लागेल.

■ यानंतर तुम्हाला तुमच्या प्रोफाइलवर जावे लागेल

■ स्क्रीनच्या वरच्या उजव्या बाजूला तीन ठिपके असतील, त्यावर टॅप करा.

■ त्यानंतर सेटिंगमध्ये जा.

■ त्यानंतर प्रायव्हसी पर्यायावर टॅप करा.

■ त्यानंतर इंटरॅक्शन टॅब अंतर्गत मेसेज पर्यायावर जा.

■ मग वर Other People टॅबमधील Others पर्यायावर टॅप करा.

■ मग डिलीवर रिक्वेस्ट टू टॅबमधील Do not Receive Requests पर्याय निवडून तुम्ही अनोळखी व्यक्तींकडून मेसेज येणं थांबवू शकता.

# चहामध्ये ‘हे’ पदार्थ ठरतील लाभदायक



**आजच्या** धकाधकीच्या जीवनात अनेक लोक सतत चहा पित असतात. पण सतत चहा पिणे आरोग्यास फार धोकादायक असते. तर काहींना सतत कॉफी पिण्याची सवय असते. पण काही औषधी पदार्थांपासून तयार केलेला चहा प्यायल्यास तो आरोग्यास लाभदायक ठरेल. कोणत्या पदार्थांच्या मदतीने चहा बनवाल वाचा.

**दालचिनी आणि चहा**

दालचिनीचा चहा तुमचे वजन कमी करतोच, पण त्याचबरोबर शरीरातील ‘मेटाबॉलिजम’ वाढवण्यास देखील मदत करतो. कसा कराल दालचिनी चहा? उकळलेल्या पाण्यात दालचिनी पावडर किंवा दालचिनीची एक काडी टाका. त्यानंतर चहाचे सेवन करा.



**आल्याचा चहा**

आल्याचे तर तसे अनेक फायदे आहेत. मात्र आल्याचा चहा सर्दी-खोकल्यात खूप आराम देतो. सर्दी-खोकला किंवा ताप असेल तर ताजं आलं छान बारीक करून घ्यावं आणि त्यात एक कप गरम पाणी किंवा दूध मिसळावं. काही वेळ ते उकळल्यानंतर ते प्यावं.

**लिंबूचा चहा**

एक कप पाण्यात आलं, काळीमिरी, लवंग घालून उकळा. त्यात अर्धा लिंबू पिळा. हा चहा दिवसातून कमीत कमी तीनदा घ्या. याशिवाय दोन चमचे मध आणि एक चमचा लिंबाचा रस एक ग्लास कोमट पाण्यात किंवा दुधात घालून प्या.

# 'अल्पना अन मी आज विवाहबद्ध झालो'! यशराजचं शुभमंगल

प्रसिद्ध संगीतकार यशराज मुखाटे हा विवाहबद्ध झाल्याची बातमी समोर आली आहे. काही वेळापूर्वी त्यानं सोशल मीडियावर पोस्ट शेयर करुन चाहत्यांना ही गोड बातमी दिली आहे. त्यानंतर त्याच्या लाखो चाहत्यांनी त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे. यशराजनं इंस्टावर ती पोस्ट शेयर करत म्हटलं आहे की, मी आणि अल्पना आज विवाहबद्ध होत आहोत. या दोन्ही सेलिब्रेटींनी नोंदणी पद्धतीनं लग्न केल्याचे दिसून आले आहे. इंस्टावर व्हायरल झालेल्या त्या फोटोनं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. गेल्या काही दिवसांपासून यशराजच्या लग्नाची चर्चा सुरु होती. अखेर तो विवाहबंधनात अडकला आहे.यशराजच्या बाबत बोलायचे झाल्यास तो कोरोना काळात जास्त प्रकाशझोतात आला होता. त्यानं तयार केलेली काही गाणी, मीम्स चाहत्यांच्या प्रतिक्रियेचा विषय होता. बॉलीवूडच्या चित्रपटांतील संवादावर आधारित गाणी आणि आणखी काही व्हिडिओ तयार करुन चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले होते. त्यामुळे तो कमालीचा लोकप्रिय झाला होता.यशराजबाबत आणखी एक गोष्ट सांगायची म्हणजे तो प्रसिद्ध संगीकार अमित त्रिवेदीचा मोठा चाहता आहे. आता यशराज आणि अमितचं गाणही प्रदर्शित झालं असून त्याला चाहत्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. जसलीन रॉयलनं त्यामध्ये गाणं गायलं आहे. यशराजच्या भावी वैवाहिक आयुष्यासाठी प्रसिद्ध अभिनेत्री सुप्रिया पिळगांवकर यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.बॉलीवूडमधील अनेक सेलिब्रेटींनी मुखातेला त्याच्या वैवाहिक आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यात मिथिला पालकर, जेमी लिव्हरसह अनेक सेलिब्रेटींचा समावेश आहे. यशराज हा त्याच्या आगळ्या वेगळ्या क्रिएटीव्हिटीसाठी ओळखला गेलेला सेलिब्रेटी असून त्याचा सोशल मीडियावर असणारा चाहतावर्ग मोठा आहे.



## दै. लोकरक्षणाय सुडोकू - १९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | 6 | | 5 | 4 | 9 | | 1 | |
| | 5 | 1 | | 7 | | | 9 | |
| | | 2 | | | | | | |
| 4 | 8 | | | | 1 | | 5 | |
| | | | 3 | | | | | 9 |
| | | 3 | | | | 4 | 7 | 8 |
| 6 | | 4 | 1 | 9 | | 2 | | |
| | | | 2 | | | | | |
| | | 8 | | 6 | | 7 | | |

## उत्तर सुडोकू -१८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 3 | 7 | 8 | 5 | 1 | 4 | 6 | 2 |
| 6 | 8 | 4 | 2 | 7 | 3 | 5 | 9 | 1 |
| 2 | 1 | 5 | 4 | 9 | 6 | 7 | 3 | 8 |
| 7 | 5 | 8 | 6 | 2 | 4 | 9 | 1 | 3 |
| 3 | 6 | 2 | 5 | 1 | 9 | 8 | 7 | 4 |
| 4 | 9 | 1 | 7 | 3 | 8 | 6 | 2 | 5 |
| 5 | 4 | 3 | 9 | 6 | 2 | 1 | 8 | 7 |
| 1 | 7 | 9 | 3 | 8 | 5 | 2 | 4 | 6 |
| 8 | 2 | 6 | 1 | 4 | 7 | 3 | 5 | 9 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# 'हास्यजत्रे'साठी सईची भावूक पोस्ट!

नेटफ्लिक्सवर भूमी पेडणेकरची भक्षक नावाची सीरिज प्रदर्शित झाली होती. त्यात सईनं साकारलेली महिला पोलीस अधिकाऱ्याची भूमिका चर्चेत होती. भूमीनं देखील सईचं कौतुक केलं होतं. आपण तिचे चाहते असून तिनं हंटरमध्ये साकारलेल्या भूमिकेची भूमीनं स्तुती केली होती. या सगळ्यात सई एका वेगळ्या कारणामुळे चर्चेत आली आहे. महाराष्ट्राची लाडकी अभिनेत्री सई ताम्हणकर ही सध्या मराठी सोबत बॉलिवुड मध्ये आपल्या अभिनयाची छाप पाडत असताना सईने सोशल मीडिया वर एक खास पोस्ट करून ती 'या' गोष्टीला खूप मिस करत असल्याचं सांगतेय. सई कायम चर्चेत असलेली अभिनेत्री तर आहे आणि नुकतीच ती तिच्या दोन सुपरहिट चित्रपटाचं यश साजरं करताना देखील दिसतेय. ‘भक्षक’ आणि ‘श्री देवी प्रसन्न’ या दोन सुपरहिट चित्रपटा नंतर आता सई नक्की काय करतेय हा प्रश्न सगळ्यांना पडला आहे. सई सध्या एक वेब शो साठी शूट करण्यात व्यस्त असून ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ मधली तिची खास जागा ती मिस करते अस तिने प्रेक्षकांना सांगितलं. आगामी वेब शो साठी शूटिंग करत असल्याने सई हास्यजत्रा मध्ये दिसत नसून तिने या बद्दल भावूक पोस्ट केली आहे. सई भावूक होऊन म्हणते ‘ वेब शो शूट करतेय म्हणून मी माझा खास शो आणि त्यातली द चेयर मिस करतेय’ सईच्या या पोस्ट ने प्रेक्षकांचं लक्ष वेधून तर घेतलं आहे पण सईच्या नव्या प्रोजेक्ट साठी प्रेक्षक उत्सुक आहेत हे देखील कळतंय. बॉलिवुड मध्ये सईच्या अभिनयाचा दबदबा कायम असताना आता सई आता मराठी की हिंदी वेब शो करतेय ? हे अजून स्पष्ट होणं बाकी आहे.



## दिनविशेष

**२९ फेब्रुवारी**

- १९२२: इजिप्तला युनायटेड किंग्डमपासुन स्वातंत्र्य मिळाले.
- १९२८: डॉ. सी. व्ही. रामन यांनी भौतिकशास्त्रातील लावलेल्या शोधला रामन इफेक्ट असे नाव देण्यात आले. यामुळे हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणुन साजरा करण्यात येतो.
- १९३५: वॅलेस कॅरोथर्स या शास्त्रज्ञाने नायलॉनचा शोध लावला.
- १९४०: बास्केटबॉल खेळ प्रथमच टेलेव्हिजन वर प्रक्षेपित झाला.
- १८७३: सायमन कमिशन या आयोगाचे अध्यक्ष सर जॉन सायमन यांचा जन्म. (मृत्यू: ११ जानेवारी १९५४)
- १८९७: मराठी ग्रंथकार डॉ. शंकर दामोदर पेंडसे यांचा जन्म. (मृत्यू: २३ ऑगस्ट १९७४)
- १९०१: रसायनशास्त्रज्ञ लिनस कार्ल पॉलिंग यांचा जन्म. (मृत्यू: १९ ऑगस्ट १९९४)
- १९२७: भारताचे १० वे उपराष्ट्रपती कृष्णकांत यांचा जन्म. (मृत्यू: २७ जुलै २००२)
- १९२९: भारतीय-अमेरिकन संशोधन रंगास्वामी श्रीनिवासन यांचा जन्म.
- १९४२: द रोलिंग स्टोन्सचे संस्थापक ब्रायन जोन्स यांचा जन्म. (मृत्यू: ३ जुलै १९६९)
- १९४४: संगीतकार व गीतकार रविन्द्र जैन यांचा जन्म.
- १९४८: ग्वाल्हेर-किराणा-जयपूर घराण्याच्या ख्याल गायिका विदुषी पद्मा तळवलकर यांचा जन्म.
- १९५१: भारतीय क्रिकेटपटू करसन घावरी यांचा जन्म.

२८ फेब्रुवारी मृत्यू

- १९२६: स्वातंत्र्यशाहीर गोविंद त्र्यंबक दरेकर उर्फ कवी गोविंद यांचे निधन. (जन्म: ९ फेब्रुवारी १८७४ झ्र नाशिक)
- १९३६: पं. जवाहरलाल नेहरू यांच्या पत्नी कमला नेहरू यांचे निधन. (जन्म: १ ऑगस्ट १८९९)
- १९६३: भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेन्द्र प्रसाद यांचे निधन. (जन्म: ३ डिसेंबर १८८४)
- १९६६: आधुनिक हिंदी नाटककार, एकांकिकाकार, कवी आणि कादंबरीकार उदयशंकर भट्ट यांचे निधन. (जन्म: ३ ऑगस्ट १८९८)
- १९६७: टाईम मॅगझिन चे सहसंस्थापक हेन्री लूस यांचे निधन. (जन्म: ३ एप्रिल १८९८)
- १९८६: स्वीडनचे २६ वे पंतप्रधान ओलोफ पाल्मे यांची हत्या. (जन्म: ३० जानेवारी १९२७)

## भविष्य

**मेष** तुमचा इतरांवर प्रभाव राहील. व्यवसायात नवीन तंत्र व मंत्र अंमलात आणू शकाल. वस्तू गहाळ होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**वृषभ** महत्त्वाची कामे दुपारनंतर मार्गी लागतील. आरोग्याच्या तक्रारी जाणवतील. मुलामुलींचे प्रश्न मार्गी लागतील.

**मिथुन** वाहने जपून चालवावीत. अनेकांचे सहकार्य लाभेल.महत्त्वाच्या गाठीभेटी पार पडतील. प्रवास शक्यतो टाळवेत.

**कर्क** राजकीय क्षेत्रात सहभागी व्हाल. महत्त्वाच्या गाठीभेटी पार पडतील. तुमच्या कार्यक्षेत्रात मानसन्मान, प्रतिष्ठा लाभेल. शासकीय कामे मार्गी लागतील. खचार्चे प्रमाण वाढेल.

**सिंह** एखादी गुप्त वार्ता समजेल. हितशत्रुंचा त्रास संभवतो. राजकीय व सामाजिक क्षेत्रात सहभागी व्हाल. मानसन्मान व प्रतिष्ठा लाभेल. भागीदारी व्यवसायातील निर्णय मार्गी लागतील.

**कन्या** मुलामुलींचे प्रश्न मार्गी लागतील. खचार्चे प्रमाण वाढेल. काहींचा धार्मिक कार्यात सहभाग होईल. एखादी भाग्यकारक घटना घडेल. कौटुंबिक जीवनात सुसंवाद साधाल.

**तुला** प्रॉपटीर्चे नवीन प्रस्ताव समोर येतील. जोडीदाराची अपेक्षित साथ लाभेल. वादविवाद टाळावेत. इतरांच्या सहकायार्ची अपेक्षा नको. एखादी महत्त्वाची वार्ता समजेल.

**वृश्चिक** जिद्दीने कार्यरत रहाल. नातेवाईकांचे सहकार्य लाभेल.वरिष्ठांबरोबर मतभेदाची शक्यता. महत्त्वाची कामे रखडण्याची शक्यता. काहींचा धार्मिक कार्यात सहभाग होईल.

**धनु** आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील. मनोबल उत्तम राहील.वस्तू गहाळ होणार नाही याची दक्षता घ्यावी. नोकरी, व्यवसायात समाधानकारक स्थिती राहील.

**मकर** आरोग्याच्या तक्रारी कमी होतील. तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी व प्रसिद्धी लाभेल. उत्साह व उमेद वाढविणारी एखादी घटना घडेल. आरोग्य उत्तम राहील.वेळ व पैसा वाया जाण्याची शक्यता.

**कुंभ** काहींना कामाचा ताण व दगदग जाणवेल. मानसिक अस्वस्थता जाणवेल.अनेकांचे सहकार्य लाभेल. महत्त्वाचे पत्रव्यवहार पार पडतील. जोडीदाराची अपेक्षित साथ लाभेल. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल.

**मीन** मित्रमैत्रिणींचा सहवास लाभेल. महत्त्वाचे पत्र व्यवहार पार पडतील. वादविवाद टाळावेत. शासकीय क्षेत्रात सुसंधी लाभेल. तुमचे कार्यक्षेत्र वाढणार आहे. मनोरंजनाकडे कल राहील. प्रॉपटीर्चे नवीन प्रस्ताव समोर येतील.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 9809386748, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# बोलविता धनी...

मराठा समाजाला आरक्षण देण्याच्या मुद्यावरून सुरू असलेल्या आंदोलनाचा लंबक समाजकारण ते राजकारण असा फिरताना दिसत आहे. गेली सहा महिने मराठा समाजाला आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलनाचे प्रमुख मनोज जरांगे-पाटील यांचा लढा सुरू आहे. तथापि, त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर विखारी आगपाखड केली, त्याने लढ्याला वेगळे वळण मिळाले, असे म्हणावे लागेल. त्याचेच पडसाद मंगळवारी विधिमंडळात उमटले.सरकारने आक्रमक भूमिका घेत आंदोलनामागचे बोलवते धनी कोण, असा प्रश्न उपस्थित करत विरोधकांवर तोफ डागली. याबाबतच्या तपासासाठी विशेष तपास पथकाची (एसआयटी) घोषणाही केली. पुरोगामी महाराष्ट्राला अशोभनीय घटना काही महिन्यांपासून घडत आहेत. सामाजिक मुद्याचे होणारे राजकारण मूळ मुद्याला बगल देणारे आणि निवडणुकीच्या तोंडावर चिखलफेकीला आमंत्रण देणारे ठरू शकते.जरांगे-पाटलांच्या आंदोलनास मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि मराठा समाजाला आरक्षण ओबीसी प्रवर्गातूनच मिळावे, या त्यांच्या मागणीमुळे दोन समुहात दुरावा निर्माण झाला होता. आंदोलन चिघळत गेले, आंदोलकांच्या मागण्यांचे रूपांतर हट्टाग्रहात झाले. जरांगे यांची भाषाही तिखट आणि विखारी झाली. परिणामी सरकारनेही मंगळवारी विधिमंडळातील आक्रमक पवित्रा घेतल्याचे दिसले.खरे तर, गेल्याच आठवड्यात जरांगे यांनी ह्यदेवेंद्र फडणवीस यांना माझा बळी घ्यायचा आहे. ते सलाइनमधून विष देऊ पाहत होते, असे गंभीर आरोप केले. त्यानंतर सरकारपक्षाने थेट शरद पवार आणि उद्धव ठाकरे यांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले. जरांगे-पाटील हे पवार आणि ठाक रे यांची स्क्रिप्ट बोलत आहेत, असा अत्यंत गंभीर आरोप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी एकाच वेळी केला.आंदोलनामागे प्रामुख्याने शरद पवार यांचाच हात आहे, असे सूचित केले. मंगळवारी विधिमंडळात या प्रश्नावरून रण माजले तेव्हा तर भाजपच्या काही नेत्यांनी तसा स्पष्ट आरोपही केला. या आंदोलनाचे कारस्थान शरद पवार यांचे समर्थक राजेश टोपे यांच्या कारखान्यात रचले गेले, असाही आरोप झाला. परंतु, टोपे यांनी या आरोपात एक टक्का जरी तथ्य आढळले तरी राजकारण संन्यास घेईन, असे प्रत्युत्तर दिले आहे.आता संपूर्ण प्रकरणाची ह्यएसआयटीह्लमार्फत चौकशीचे आदेश विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले आहेत. त्यामुळे आंदोलनाचे सारे पदर उजेडात येतील, अशी अपेक्षा आहे. मात्र, त्यासाठी चौकशी सर्वंकष आणि निष्पक्षच हवी. चौकशीस एकतर्फी स्वरुप आले तर त्यामागील उद्देशालाच हरताळ फासला जाईल.आंदोलनामागील समाजकारणास राजकीय वळण मिळाल्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर सत्ताधाऱ्यांच्या हातात आयतेच कोलित आले आहे. मात्र, हा संघर्ष महाराष्ट्राची केवळ सामाजिकच नव्हे; तर आर्थिक तसेच सांस्कृतिक वीण विस्कटणारा आहे. मुख्यमंत्री शिंदे यांनी विधिमंडळात वापरलेली भाषा गेले चार महिने त्यांचेच मंत्रिमंडळातील ज्येष्ठ सहकारी छगन भुजबळही बोलत आहेत.राजकीय पुढाऱ्यांना गावबंदी करणारे हे कोण, असा सवाल मुख्यमंत्र्यांनी केला. तोच भुजबळांनी दोन-अडीच महिन्यांपूर्वी केला होता. तेव्हा शिंदे व फडणवीसांनी मिठाची गुळणी घेतली होती. मग आजच त्यांना या प्रश्नाची तीव्रता का जाणवली? जरांगे-पाटलांच्या या आंदोलनास रसद कोण पुरवते आहे, हा शिंदे यांचा प्रश्न आहे की इशारा? हे स्पष्ट व्हायला हवे.मात्र, जरांगे-पाटलांची वक्तव्ये जोवर राजकीय नव्हती, तोपावेतो मी त्यांच्या पाठीशी होतो, अशी मखलाशीही मुख्यमंत्र्यांनी केली. सत्ताधारी अचानक आक्रमक का झाले, त्यामागे कोणाचे राजकीय हितसंबंध तर नाहीत ना, अशा बाबींचाही विचार व्हावा. तरच या प्रकरणामागील नेमके सत्य बाहेर येईल.खरे तर जरांगे-पाटलांच्या आंदोलनानंतर सरकारने मराठा समाजाला आर्थिक निकषावर १० टक्के आरक्षणाचा घेतलेला निर्णय मोठे पाऊल होते. त्यानंतरही जरांगे यांनी सगे-सोयरे हा मुद्दा कायम ठेवला आणि आंदोलन भलत्याच वळणावर गेले. न्यायालयीन कसोटीवरही सरकारचा निर्णय मान्य होण्याची शक्यता दिसत असताना, जी चिखलफेक चाललेली आहे ती महाराष्ट्राच्या पुरोगामीपणाला न शोभणारी आहे.शिवाय, हा विषय अंतिम टप्प्यात असताना सुरू झालेला राजकीय शिमगा मन विषण्ण करणारा आहे. खरेतर शासन दरबारी हक्कासाठी लढताना साधनशुचितेचे, मर्यादांचे पालन करायचे असते. तारतम्य, तोल यांचा समन्वय साधायचा असतो. त्याची वानवा सध्याच्या घटनेत दिसते. त्यामुळे दोन्हीही बाजूंनी सामंजस्याचा पूल शाबूत ठेवून पावले टाकणे महाराष्ट्रहिताचे ठरेल.

# नोबेल मानकऱ्यांचे माय-बाप



**नोबेल विजेत्या वैज्ञानिकांची जडणघडण कशी झाली, हे पाहिले तर काही समान धागे निश्चित सापडतात. आजच्या (ता.२८) विज्ञानदिनानिमित्ताने अशा नोबेलविजेत्या शास्त्रज्ञांच्या जडणघडणीवर टाकलेला प्रकाश. नोबेल मानकऱ्यांचे नाव एका दिवसांत जगभर गाजते. तथापि त्यांची जडण-घडण करणाऱ्या आई-वडिलांची माहिती मिळत नाही. त्यांचे पालक अत्यंत हुशार, श्रीमंत असतील, त्यांना शिक्षकांचे खास मार्गदर्शन मिळाले असेल, अनुकूल परिस्थिती लाभल्यानेच ते नोबेल विजेते झाले, अशी समजूत होऊ शकते. ती बरोबर नसते. विज्ञानदिनाच्या निमित्ताने आपण हे समजावून घ्यायला पाहिजे.**

कित्येक नोबेल मानकरी पीएच. डी. ही झालेले नव्हते. क्वचित ज्यांना ज्या विषयातील नोबेल पारितोषिक मिळालं त्यांचा तो विषयच नव्हता! अनेक मानकऱ्यांचे माय-बाप सामान्य परिस्थितीत जीवन जगत होते. काही तर अनाथ होते. कुणाला आपले आई-वडील कोण, हेही माहिती नव्हते! सर सी.व्ही. रामन यांचे वडील तिरुचिलापल्लीमधील शाळेत गणित शिकवायचे. आई गृहकृत्यदक्ष. वडिलांचा पगार महिना दहा रुपये. त्यांचे बालपण मध्यमवर्गीय कुटुंबात गेले. ते म्हणत, आय वॉज बॉर्न विथ ए कॉपर स्पून इन माऊथ . पदवी मिळवण्याआधीच त्यांचे दोन शोधनिबंध ब्रिटिश जर्नल ऑफ फिलॉसॉफिकल मॅगझीनमध्ये प्रकाशित झाले. पदार्थविज्ञानामध्ये पदव्युत्तर पदवी मिळवल्यावर त्यांची प्रोफेसर म्हणून नेमणूक झाली. प्रबंध न लिहिताही प्रो. आशुतोष मुखर्जींनी त्यांना ऑनररी डॉक्टर ऑफ सायन्स पदवी बहाल केली. सर रामन यांना ह्यरामन इफेक्ट बद्दल नोबेल पारितोषिक मिळाले तेव्हा ते पीएच.डी. नव्हते. त्यांचे कुटुंब वाचनप्रिय होतं. त्यांचे पुतणे सुब्रह्मण्यम चंद्रशेखर महान खगोलशास्त्रज्ञ होते. त्यांनाही १९८३मध्ये नोबेल पारितोषिक मिळाले. त्यांचे वडील लेखापाल आणि आई लेखिका होती. हे कुटुंब मध्यमवर्गीय आणि सुशिक्षित, सुसंस्कृत होते. हरगोविंद खोराना १९६८मध्ये वैद्यकशास्त्रातील नोबेल मानकरी झाले. त्यांनी वैद्यकीय शिक्षण घेतलेले नव्हते. त्यांनी प्रथिनांची जडणघडण आणि जनुकांची क्रमवारी यांचा संबंध स्पष्ट केला होता. त्यांचा जन्म रायपूरमध्ये १९२२मध्ये झाला. गावाची लोकसंख्या १०० होती. फक्त खोराना कुटुंबीय सुशिक्षित होतं. घरची गरिबी. वडील कृषीखात्यात कारकून. घरचे सारेजण सुशिक्षित असावेत, म्हणून त्यांनी सतत प्रयत्न केले. व्यंकटरामन रामकृष्णन् यांना २००९मध्ये रसायनशास्त्रातील नोबेल मिळाले. त्यांनी पेशींमध्ये रायबोसोमवर प्रथिनांची निर्मिती कशी होते, याचा शोध घेतला. त्यांचे आई-वडील परदेशात पीएच.डी. करत होते. भारतात आजी-आजोबांनी सांभाळ केला. रामकृष्णन् यांचे शालेय-महाविद्यालयीन शिक्षण बडोद्यात झालं. घरी पुस्तकांचा खजिना होता. नोबेल विजेते होण्यापर्यंत त्यांची जी प्रगती झाली, त्याचे बहुतांशी श्रेय ते त्यांना जीव ओतून शिकवणाऱ्या भारतीय शिक्षकांना आणि पालकांनाही देतात. सामान्य पार्श्वभूमीवर मात इंग्लंडच्या पॉल नर्स २००१मधील वैद्यकशास्त्रातील नोबेल मानकरी झाले. पेशींचे विभाजन होताना लागणारा घटक त्यांनी शोधला होता. त्यांचे नोबेल संशोधन लंडनच्या इम्पेरिकल कॅन्सर रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये झाले. त्यांना अमेरिकेत संशोधनाची संधी मिळाली. त्यांनी ५७व्या वर्षी ग्रीन कार्डसाठी अर्ज केला, तो नामंजूर झाला. कारण अर्जामध्ये आई-वडिलांच्या नावात आणि जन्मतारखेच्या दाखल्यातील नावे वेगळीच होती. आईचे नाव वेगळेच होते. वडिलांच्या नावापुढे फुली होती. वडील कोण माहिती नव्हते! खऱ्या आई-वडिलांऐवजी त्यांचा सांभाळ आजी-आजोबांनी केला; त्यांचेच नाव त्यांना मिळाले. जनुकीय विषयाचे तज्ज्ञ असूनही त्यांना आपल्याला कोणाचे जीन्स मिळाले, हे माहिती नाही. ते गमतीने म्हणतात- माझे भाऊ एका दिवसांत माझे काका झाले; बहिणी मावश्या आणि आई-वडील आजी-आजोबा झाले! त्यांच्या आजीचा आणि आजोबांचा विज्ञानाशी संबंध नव्हता. आजी सफाई कामगार आणि आजोबा मेकॅनिक होते. मात्र दोघांनीही खस्ता खाल्ल्या; आणि पॉलच्या शिक्षणासाठी खर्च केला. यामुळे सामान्य परिस्थितीतील पॉल नर्स नोबेलचे मानकरी झाले. दैनंदिन जीवनात फिरताना आपल्याला नकाशाची किंवा जीपीएसची गरज वाटत नाही. कार्यालय, घर, हॉटेल, दुकानं अशा ठिकाणी सहजतेने जातो. असंख्य जागा आपला मेंदू कशा, कुठे लक्षात ठेवतो, या संबंधीचे विज्ञान उलगडून दाखवणारे जॉन ओक्लिफ, मे-ब्रिट मोझर आणि एडवर्ड मोझर यांना २०१४मध्ये वैद्यकशास्त्रातील नोबेल मिळाले. एडवर्ड मोझर नॉर्वेच्या हॅरीड बेटावर राहात. त्यांच्या पालकांनी शालेय शिक्षण पूर्ण केलं नव्हतं.

वडील ऑर्गन दुरुस्ती करायचे. आई घरकाम करायची. दोघांनी एडवर्डच्या शिक्षणासाठी प्रयत्न केले. मे-ब्रिटचा जन्म नॉर्वेच्या खेड्यात झाला. त्यांचे वडील सुतारकाम करायचे. आई शेतावर राबायची. एडवर्ड आणि मे-ब्रिट यांनी मानसशास्त्रातील पदवी मिळवली. न्युरोफिजिओलॉजी विषयात पीएच.डी. मिळवून ते विवाहबद्ध झाले. आपला मेंदू निरनिराळ्या 'जागा' मेंदूच्या हिप्पोकॅपस भागातील पेशी कशा लक्षात ठेवतात, त्याचा शोध लावला. त्यांचे पीएच.डी.चे मार्गदर्शक जॉन ओकिफ यांचे वडील बसदुरुस्ती करायचे, आई वेल्डिंगची कामे करायची. तिघांनीही थेट वैद्यकक्षेत्रात कार्य केले नव्हते. कुणाचेच पालक खूप शिकलेले नव्हते.जाठरव्रण (पेप्टिक अल्सर) झाल्यावर पोटात वेदना होतात. मानसिक ताणतणावामुळे ही व्याधी जडते, अशी समजूत होती. परंतु बॅरी मार्शल आणि जे. रॉबिन वॉरन या ऑस्ट्रेलियातील दोन डॉक्टरांनी ही व्याधी जठरातील हेलिकोबॅक्टर पायलोरी या जीवाणूंमुळे जडते, हे सिद्ध केले. यामुळे योग्य अँटिबायोटिक्सच्या उपचाराने रुग्ण व्याधीमुक्त झाले. या शोधामुळे मार्शल आणि वॉरन २००५मध्ये नोबेल विजेते झाले. परंतु दोघांच्या घरची परिस्थिती यथातथाच होती. बॅरी मार्शलचे वडील टर्नर-फिटर आणि आई नर्स होती. वॉरन यांचे मध्यमवर्गीय कुटुंब होते. त्यांना लहानापासून फिट्स येत. हेलिकोबॅक्टर पायलोरीमुळे जाठरव्रण होतो, हे सिद्ध करण्यासाठी बॅरीने जंतूंनी भरलेले पाणी पिऊन स्वतःवर प्रयोग केले होते.

अर्थात हे कृत्य योग्य नव्हते; पण शेवट गोड झाला! जर्मनीचे टेड हेंच यांचे वडील कृषीयंत्र विक्रेते होते. त्यांच्या बालपणी दुसऱ्या महायुद्धातील विषण्ण वातावरण होते. तरीही टेड रानावनात भटकंती करायचे. व्यायामशाळेत जायचे, पुस्तके वाचायचे. वडिलांनी त्यांना अनेक म्युझियममध्ये आणि संशोधकांकडे नेले. विज्ञानाची आवड निर्माण झाली. प्रतिकूल वातावरणातही त्यांनी क्वांटम आणि ऑप्टिक्स या विषयांचे संशोधन करून २००५मध्ये नोबेल पारितोषिक मिळवले. अनेक नोबेल विजेत्यांची पूर्वपीठिका लक्षात घेतली की, काही ढोबळ निष्कर्ष काढता येतात. त्यांच्या आई-वडिलांनी आणि शिक्षकांनी त्यांना वाचन, मनन आणि चिंतन करण्याची आवड लावली. कुटुंबातील प्रेम, विश्वास आणि सुसंवादामुळे त्यांचे भावनिक, सामाजिक आणि बौद्धिक जीवन समृद्ध झाले. पालकांनी आपल्या इच्छा किंवा कल्पना त्यांच्यावर लादल्या नाहीत. त्यांच्या आवडीला प्रोत्साहन दिलं. त्यांच्या जाणीवांच्या कक्षा रुंदावल्या गेल्या. त्याला मेहनतीची जोड मिळाली आणि नोबेलसारख्या पारितोषिकांनी आपण होऊन त्यांचा स्वीकार केला!

# अखेर दोन उपमुख्य अधीक्षक निलंबित

## 'विशिष्ट' फाईलवरून झालेल्या वादानंतर प्रशासनाची कठोर कारवाई

**मीरा रोड** : मीरा-भाईंदर महापालिकेच्या उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागात कार्यरत असलेले उपमुख्य अधीक्षक हंसराज मेश्राम व नागेश विरकर यांच्यात १६ फेब्रुवारी रोजी दुपारीएका फाईलवरून भाईंदर पश्चिमेच्या नगर भवन कार्यालयात वाद निर्माण झाला. याची चौकशी करण्याचे आदेश आयुक्तांनी अतिरिक्त आयुक्तांना दिले होते. त्यांची चौकशी केल्यानंतर सोमवारी त्यांना सेवेतून निलंबित केल्याचा आदेश जारी करण्यात आला आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेने शहरातील उद्यानांची देखभाल व निगा राखण्यासह दुरुस्तीची निविदा काढली जाते. यामध्ये यापूर्वी देखील भ्रष्टाचार झाल्याचे आरोप झाले आहेत. उद्यान विभागाकडून याची निविदा काढली होती. या निविदेची फाईल उद्यान विभागाचे प्रभाग समिती कार्यालय क्रमांक ४, ५ व ६ मधील उपमुख्य उद्यान अधीक्षक नागेश विरकर यांच्या कार्यालयात होती. ती फाईल प्रभाग समिती कार्यालय क्रमांक १, २ व ३ चे उपमुख्य अधीक्षक हंसराज मेश्राम यांनी १६ फेब्रुवारी रोजी प्रभारी उद्यान अधीक्षक यांच्याकडून वरिष्ठांची कोणतीही परवानगी न घेता परस्पर नेली. फाईल नेल्याची माहिती मिळताच विरकर यांनी मेश्राम यांच्या दालनात जाऊन ती फाईल घेण्यासाठी कार्यालयाची झाडाझडती घेण्यास सुरुवात केली. परंतु विरकर यांनी ही माहिती वरिष्ठांना कळवणे आवश्यक होते. परंतु त्यांनी माहिती न देता कार्यालयाची तपासणी करत वाद केला. मेश्राम व विरकर यांच्यात धक्काबुक्की झाली. हा वाद पोलीस ठाण्यापर्यंत पोहोचला. मेश्राम यांनी विरकर यांच्याविरोधात भाईंदर पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज केला. यासाठी मेश्राम यांनी पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज देण्यापूर्वी वरिष्ठांची कोणतीही परवानगी घेतली नाही. या दोघांत झालेल्या वादाची आयुक्तांनी चौकशी करण्याचे आदेश अतिरिक्त आयुक्त अनिकेत मनोरकर यांना दिले होते. या चौकशीदरम्यान अतिरिक्त आयुक्तांनी मेश्राम यांना अनेकदा मोबाईलद्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र मेश्राम यांनी फोन उचलला नाही, तसेच मोबाईलवर केल्यानंतरही अतिरिक्त आयुक्तांना कोणताही संपर्क साधला नाही. या प्रकरणाची दोघांना प्रशासनाने खुलासा सादर करण्याचे आदेश दिले. त्या दोघांनी सादर केलेला खुलासा प्रशासनाने अमान्य केला.

■ त्या दोघांमध्ये झालेल्या वादामुळे महापालिकेची शहरात बदनामी झाल्याचा ठपका ठेवत आयुक्तांनी त्या दोघांनाही सेवेतून निलंबित केल्याचा आदेश जारी करण्याचे निर्देश उपायुक्त मारुती गायकवाड यांना दिले . त्यानुसार उपायुक्तांनी सोमवारी दोघांना सेवेतून निलंबित केल्याचा आदेश काढला आहे .

# थकबाकी न भरणाऱ्यांचा पाणीपुरवठा खंडित करा

## अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांचे निर्देश


**ठाणे** : पालिका क्षेत्रातील पाणी बिलांची थकबाकी तातडीने वसूल करावी. थकबाकी न भरणाऱ्यांचा पाणीपुरवठा खंडित करावा, असे निर्देश पालिका अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी दिले आहेत. पालिकेला सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात एकूण २२३ कोटी रुपयांची पाणी देयके वसूल होणे अपेक्षित आहे. त्यात ८८ कोटी रुपयांची थकबाकी असून १३४ कोटी रुपये चालू वर्षाची पाणी देयके आहेत.

त्यापैकी २२ कोटी रुपयांची थकबाकी, तर ५९ कोटी रुपये चालू वर्षाची देयके असे एकूण ८१ कोटी रुपये वसूल झाले आहेत. ३१ मार्चपर्यंत सुमारे १४१ कोटी रुपयांची वसुली करण्याचे आव्हान पाणीपुरवठा विभागासमोर आहे. थकबाकी आणि चालू बिलांची वसुली तातडीने करावी. त्यात हयगय करू नये, असे निर्देश माळवी यांनी पाणीपुरवठा विभागाच्या आढावा बैठकीत दिले. यावेळी उपनगर अभियंता विनोद पवार, विकास ढोले यांसह पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. जे थकबाकीदार



कारवाई करताना त्वरित रकमेचा भरणा करणार नाहीत, अशा थकबाकीदारांचा पाणीपुरवठा तत्काळ खंडित करावा. हा पाणीपुरवठा परवानगीशिवाय पूर्ववत केल्यास संबंधित ग्राहक, गृहसंकुलाचा पाणीपुरवठा मुख्य जलवाहिनीवरून खंडित करण्याचे आदेश माळवी यांनी दिले.

# Lightning strikes kill two killed in Jalna district



**Chhatrapati Sambhajinagar:** Two persons were killed in lightning strikes by unseasonal rains in two talukas of Maharashtra's Jalna district, an official report said on Wednesday. The deceased also included a woman.

Two persons, including a woman - residents of different villages in Bhokardan taluka -- were killed in lightning strikes during the rains, said the report issued by the Divisional Commissioner's office in Chhatrapati Sambhajinagar.

Crops on 11,691 hectares of land were adversely affected in the rains and hailstorms, said the report, citing initial assessment.According to the report, 20,801 farmers from 66 villages in Bhokardan and Jafrabad suffered losses due to damage caused to crops like wheat, pea and maize.

Meanwhile, India recorded extreme weather events on 318 of the 365 days in the year 2023, with all states and Union territories experiencing such events on at least one day, according to a new report released on Wednesday.

These extreme weather events resulted in 3,287 human deaths, 1.24 lakh animal deaths, and damage to 2.21 million hectares of crop area, a report by independent think tank the Centre for Science and Environment's "State of Environment 2024" said.

Himachal Pradesh recorded the highest number of days with extreme weather at 149, followed by Madhya Pradesh with 141, and Kerala and Uttar Pradesh with 119 each.

Eight states recorded more than 100 days of extreme weather, the report said. Heavy rains, floods and landslides were recorded on 208 days in 2023. Lightning and storms occurred on 202 days, heatwaves on 49 days, cold waves on 29 days and cloudbursts on nine days.

# One dead, 5 hurt as wall of under-construction godown collapses in Vasai



**Thane:** Six persons were trapped under debris after wall of under-construction godown in Vasai collapsed; officials said the structure was being built illegally. A 30-year-old man died and five persons were grievously hurt after an under-construction wall fell on them at Pelhar in Vasai East on Tuesday evening.

The incident happened at a site where some persons were engaged in the construction of an illegal godown. According to the officials, in the wall collapse that happened at Chaudhary Compund in Vakan Pada at Pelhar, labourer Dasrath Gopal Lahange, aged 30, was killed. The injured--Shailesh Shingada (19), Ramu Mage (25), Kalpesh Nadge (19), Bharat Dumada (19)--were admitted to Apex Hospital in Valiv. One among the five injured has not been identified yet. Police officials said that the wall collapse incident happened around 5.30 pm on Tuesday at Chaudhary Compound.

Labourers were engaged in the construction of godowns inside the compound which were illegal. Suddenly, a wall of one under-construction godown collapsed, trapping six persons under the debris. Other labourers at the scene rushed to help and rescue the injured individuals; they rushed them to the hospital.

Dashrath Lahange was taken to Platinum Hospital, where he was pronounced dead. Much to everyone's dismay, the fire brigade arrived three hours after the incident was reported and were ill-equipped.

Sources told mid-day that the fire brigade team arrived at the scene around 8 pm and due to inadequate lighting, they conducted the search operation using in-built flashlights in mobile phones. The civic officials too arrived at the scene very late in the night.

